## <u>रे.मु.नं.३२३/२०१८ मधील नि.१८ वरील आदेश</u>

(मावजी पटेल वि. राजकुमार वेळापूरे व इतर)

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफीयतीचा आदेश रद्द होऊन कैफीयत अभिलेखावर घेण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन आहे की, वादीने अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दावा दाखल केला आहे. दावा किंमती मिळकतीचा असल्याने बरीच जुनी कागदपत्रे पाहणे व त्याच्या नक्कला काढणे आवश्यक होते. दरम्यानचे काळात असेंबली निवडणुका असल्याने महसूल विभागाकडून नक्कला मिळण्यास बराच कालावधी लागला आहे. त्यामुळे प्रतिवादींना मुदतीत कैफीयत दाखल करता न आल्याने प्रतिवादींविरुध्द विनाकैफीयतीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. दावा हा स्थावर मिळकती संदर्भातील असल्याने प्रतिवादींची कैफीयत अभिलेखावर येणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादींनी त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफीयतीचा आदेश रद्द होऊन कैफीयत स्विकारण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास म्हणणे देऊन तीव्र हरकत घेतली आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. प्रतिवादींनी जाणूनबुजून विलंब लावला आहे. त्यामुळे अर्ज रद्द करण्याची विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे पाहिले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा

मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन करता समन्सच्या बजावणीनंतर प्रतिवादी दाव्यात हजर झाले आहेत मात्र त्यांनी विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही त्यामुळे प्रतिवादींविरुध्द दिनांक ०७.१२.२०१९ रोजी विनाकैफीयतीचा आदेश पारीत करण्यात आला आहे. प्रतिवादींनी निवडणुकांमुळे महसूल विभागाकडून कागदपत्रांच्या नक्कला मिळण्यास उशीर झाल्याने त्यांना मुदतीत कैफीयत दाखल करता आले नाही असे कारण दिलेले आहे. दावा हा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी असून त्यात प्रतिवादीचे हितसंबंध गुंतलेले असल्याने दाव्याचा गुणवत्तेवर निकाल होणेकामी प्रतिवादींना न्यायाच्या दृष्टीने त्याची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द झालेला विनाकैफीयतीचा आदेश रद्द करुन त्यांची कैफीयत अभिलेखावर घेतल्यास वादीचे काहीएक नुकसान होणार नाही. उलटपक्षी दाव्याच्या गुणवत्तेवर निकालासाठी प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे जरुरीचे आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींविरुध्द झालेला दिनांक ०७.१२.२०१९ रोजीचा विनाकैफीयतीचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांची कैफीयत अभिलेखावर घेण्यात येते.

माळशिरस — ( जी. एम. नदाफ )

दि.२९.०९.२०२१ — सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word to word as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : S.S.Mitragotri |
| Name of the court | : Jt. Civil Judge Jr. Division, Malshiras. |
| Order signed by Presiding Officer on | : 29.09.2021 |
| Order uploaded on | : 30.09.2021 |